3 त्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अँण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४५४ वा • मंगळवार, ता. २५ नोव्हेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## भारतीय नौदलात ‘आयएनएस माहे’

### स्वदेशी पाणबुडीविरोधी युद्धनौका समुद्र सुरक्षेस सज्ज



**मुंबई । रयत समाचार**

भारतीय नौदलाने स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित नवीन पाणबुडीविरोधी युद्धनौका ‘आयएनएस माहे’चा सोमवार, ता. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी ताफ्यात औपचारिक समावेश केला. कोची शिपयार्ड लिमिटेडने बांधलेली ‘माहे-क्लास’ शॅलो वॉटर क्राफ्टची ही पहिलीच नौका असून, किनारी सुरक्षेपासून पाणबुडी शोध कारवायांपर्यंत युद्ध सज्जतेत मोठी भर पडणार आहे.

नौदल डॉकयार्ड, मुंबई येथे पार पडलेल्या समारंभाला लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ‘आयएनएस माहे’चा ताफ्यात समावेश हा आत्मनिर्भर भारत मोहिमेतील महत्त्वाचा टप्पा असल्याचे नौदलाने सांगितले.

ही नवीन पिढीची स्वदेशी युद्धनौका टॉर्पेडो आणि अँटी-सबमरीन रॉकेट्ससह सज्ज असून, शत्रूच्या पाणबुड्यांचा शोध घेणे, किनारपट्टीवर गस्त ठेवणे आणि भारताच्या सागरी मार्गांचे संरक्षण करणे अशी प्रमुख कामगिरी पार पाडणार आहे. ही नौका नौदलाला २३ ऑक्टोबर रोजी सुपूर्द करण्यात आली होती.

नौदलाच्या माहितीनुसार, ‘माहे-क्लास’ युद्धनौकांमध्ये ८० टक्क्यांहून अधिक स्वदेशी घटकांचा समावेश आहे. वेग, हलकेपणा, अचूकता आणि गतिशीलता हे या नौकेचे प्रमुख गुण असून किनारी भागातील ऑपरेशन्ससाठी ती अत्यंत सामर्थ्यशाली ठरणार आहे.

‘आयएनएस माहे’च्या समावेशामुळे भारताची सागरी संरक्षण क्षमता अधिक मजबूत आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाल्याचे नौदलाने स्पष्ट केले.

मालबार किनाऱ्यावरील ऐतिहासिक माहे शहराच्या नावावरून ही नौका नामांकित करण्यात आली आहे. तिच्या ध्वजचिन्हावर ‘उरुमी’ (कलारीपयट्टूतील लवचीक तलवार) कोरली असून, ती जहाजाच्या वेग, चपळाई आणि लढाऊ कौशल्याचे प्रतीक आहे.

## गवईंवरील बूटफेक प्रकरणी नवसर्जन संस्थेचा अनोखा उपक्रम

### दलित विद्यार्थ्यांना ५ हजार बुटांचे वाटप

**अहमदाबाद । रयत समाचार**



भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान झालेल्या बूटफेक प्रकरणानंतर गुजरातमधील नवसर्जन या मानवाधिकार संघटनेने एक अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या संघटनेने दलित समुदायातील गरजू विद्यार्थ्यांना तब्बल ५ हजार बुटांचे जोड वाटण्याची घोषणा केली आहे. २६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत गुजरात, महाराष्ट्र, ओडिशा, उत्तर प्रदेश, चंदीगड आणि राजस्थान या राज्यांतील विद्यार्थ्यांना हे बुटांचे जोड वाटण्यात येणार आहेत. आरक्षणाचा लाभ मिळालेल्या समाजघटकातील व्यक्तींनी या उपक्रमासाठी आर्थिक मदत करावी, अशी विनंती नवसर्जनकडून करण्यात आली आहे. या वाटपासाठी दलित शक्ती केंद्र आणि दलित फाउंडेशनही संस्थाही सहभागी झाल्या आहेत.

नवसर्जनचे संस्थापक मार्टिन मकवान यांनी सांगितले की, सरन्यायाधीश गवई यांच्यावर बूट फेकण्याच्या घटनेनंतरच या उपक्रमाची संकल्पना आकाराला आली. ‘‘आरक्षणाचा लाभ मिळालेल्या व्यक्तींना आम्ही देणगीसाठी संपर्क करत आहोत. ही त्यांची सामाजिक जबाबदारी आहे, असे आम्ही त्यांना सांगत आहोत. आरक्षणानंतर अनेकजण समाजापासून दुरावताना दिसतात आणि त्यामुळेच समाजसंघटन कमकुवत होते,’’ असे मकवान यांनी स्पष्ट केले.

उपक्रमासाठी ‘बूट’ हा घटक निवडण्यामागेही सरन्यायाधीशांवरील बूटफेकीचाच संदर्भ असल्याचे मकवान म्हणाले. ‘‘कारण संपूर्ण घटनेच्या मध्यभागी बूटच होते, म्हणूनच हे प्रतीक म्हणून निवडले,’’ अशी त्यांची प्रतिक्रिया आहे.

या उपक्रमात स्वयंसेवक गावागावांत जाऊन आरक्षणाचा लाभ मिळालेल्या कुटुंबांची माहिती गोळा करतील. त्यांच्याकडून एका जोड बुटांसाठी किमान २०० रुपयांची देणगी घेतली जाईल. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना हे बुटांचे जोड दिले जाणार आहेत. सुरुवातीला १ हजार जोडांचे लक्ष्य ठेवण्यात आले होते; परंतु मोठ्या प्रतिसादामुळे लक्ष्य वाढवत ५ हजार जोडांचे वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मकवान यांनी सांगितले.

## इफ्फी मध्ये नगरचा डंका!



## ‘हमसफर’चा ‘इफ्फी’त गौरव

### आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलमध्ये स्क्रिनिंग



**पणजी । प्रभाकर ढगे**

अहिल्यानगरच्या मातीतील कलावंतांनी साकारलेल्या ‘हमसफर’ या मूक लघुपटाने गोव्यात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ‘इफ्फी’मध्ये आपली छाप उमटवली. इंडियन पॅनोरमा विभागात निवड झाल्यानंतर या लघुपटाचे अधिकृत स्क्रिनिंग करण्यात आले.

उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या अनुष्का मोशन पिक्चर्स अँड एंटरटेन्मेंट निर्मित या लघुपटात अभिनेते विजय पाटकर यांनी प्रमुख भूमिका साकारली असून इतर सर्व कलाकार अहिल्यानगरचे आहेत. यापूर्वी या लघुपटाला दादासाहेब फाळके पुरस्कारही मिळाल्याने त्याची प्रतिष्ठा अधिक वाढली आहे.

स्क्रिनिंगदरम्यान निर्माते नरेंद्र फिरोदिया, दिग्दर्शक अभिजीत दळवी, तसेच राखी फिरोदिया, अभिजीत दळवी, प्रणित मेढे, नितेश कटारिया, पुष्कर तांबोळी यांना इफ्फीतर्फे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

भारतीय संस्कृतीत वस्तूही भावनिक मूल्य घेऊन सहचर्याचे प्रतीक कशा बनतात, हे या कथेतून प्रभावीपणे मांडले आहे.

रेडिओ हरवल्यानंतर आजोबांचा त्याला शोधण्याचा प्रवास हा प्रत्यक्षात जोडलेल्या भावनांचा शोध ठरतो. नातेसंबंध, गमावणे, आठवणी आणि भारतीय जीवनातील भावनिक बंध यांचे कालातीत दर्शन घडवणारा हा लघुपट प्रेक्षकांना हसवतोही आणि डोळ्यात पाणीही आणतो.

अहिल्यानगरच्या कला-सर्जनक्षमतेला राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळवून देणारा ‘हमसफर’ हा लघुपट स्थानिक चित्रपटसृष्टीसाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे.

‘हमसफर’ हा एक भावनिक मूक लघुपट असून कथानक एका आजोबा आणि त्यांच्या जुन्या रेडिओभोवती फिरते. आजोबांसाठी हा रेडिओ केवळ वस्तू नसून आठवणी, सोबत आणि जिव्हाळा जपून ठेवणारा ‘हमसफर’ आहे.



## दक्षिण आफ्रिकेकडून ३१४ धावांची भक्कम आघाडी

**गुवाहाटी । रयत समाचार**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरी कसोटी गुवाहाटी येथील बरसापुरा क्रिकेट स्टेडियमवर रंगतदार टप्प्यात पोहोचली आहे. मार्को जॅन्सनच्या भेदक गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाज पुन्हा गुडघे टेकताना दिसले. तिसऱ्या दिवशी भारताचा पहिला डाव फक्त २०१ धावांवर गारद झाला आणि दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावात एकाही विकेटचा बळी न गमावता २६ धावांची मजबूत सुरुवात केली. दक्षिण आफ्रिकेकडे आता एकूण ३१४ धावांची आघाडी आहे आणि भारताचा पराभव निश्चित असल्याची चिन्हं स्पष्ट दिसत आहेत. जॅन्सनने वेग आणि उंच उसळीचा कमाल संगम करत ६ विकेट्सचा ‘षटकार’ नोंदवला, तर सायमन हार्मरने तीन विकेट्स घेत भारताचा नवा डाव उद्ध्वस्त केला. भारताकडून यशस्वी जैस्वालने ५८ आणि वॉशिंग्टन सुंदरने ४८ धावांची लढाऊ खेळी केली. पण उर्वरित फलंदाज पुन्हा निराशाजनक कामगिरी करत धावसंख्या २०१ पार नेऊ शकले नाहीत. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार बावुमाने फॉलो-ऑन लागू न करण्याचा निर्णय घेत पाहुण्या संघाने भारतीय गोलंदाजांच्या विरोधात दुसरा डाव सुरु केला. रिकेल्टन (१३) आणि मार्कराम (१२) नाबाद असून चौथा दिवस भारतासाठी ‘करो या मरो’ ठरणार आहे.

### भारतासमोर ‘क्लीन स्वीप’चा धोका

## भाजपचा मोठा निर्णय; स्थानिक स्वराज्य निवडणुकांत ४०% जागा तरुणांना

**मुंबई । रयत समाचार**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी वेग घेत असतानाच भाजपने मोठा निर्णय घेतला आहे. येत्या निवडणुकांमध्ये पक्षातील तरुणांना मोठी संधी देणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ३५ वर्षांखालील तरुणांना किमान ४० टक्के जागा देण्याचा निर्णय भाजपने घेतला असून, या निर्णयामुळे राजकीय क्षेत्रात नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार आहे. मुंबईत आयोजित तरुण नेतृत्त्व संवाद कार्यक्रमात फडणवीस म्हणाले, ‘‘राज्याच्या भविष्याचा पाया हा तरुणांचा आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये आम्ही किमान ४० टक्के उमेदवार हे ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे असतील याची हमी देणार आहोत,’’ असे ते म्हणाले. या निर्णयामुळे अनेक वरिष्ठ नेत्यांचे तिकीट कापले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नगर परिषद, नगर पंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समितीपासून ते महापालिका निवडणुकांपर्यंत हा निर्णय लागू होणार असल्याचेही



फडणवीस यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांनीदेखील तरुणांना जागा देण्याची घोषणा काही दिवसांपूर्वी केली होती. त्यामुळे राज्यातील निवडणुकीचा रंगतदार सामना हा नव्या पिढीच्या नेतृत्वात होण्याची शक्यता आहे. राज्यात सध्या महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. प्रचार मोहीम, गठबंधन आणि तिकीटवाटपाचे राजकारण वेग पकडत असून, भाजपच्या या निर्णयामुळे तरुण राजकारणी आणि कार्यकर्त्यांमध्ये नवीन आशा निर्माण झाली आहे.

## जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर घुले बिनविरोध



**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनानंतररिक्त झालेल्या अध्यक्षपदासाठी काल सोमवार, ता. २४ नोव्हेंबर २०२५ रोजीघेण्यात आलेल्या निवड प्रक्रियेत माजी आमदार चंद्रशेखर घुले यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सकाळी ११ वाजता जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची अधिकृत बैठक पार पडली. या बैठकीत सर्व संचालकांच्या एकमताने घुले यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. अध्यक्षपद रिक्त झाल्यानंतर बँकेच्या पुढील धोरणात्मक निर्णयांसाठी ही निवड प्रक्रिया घेण्यात आली. घुले यांच्या नेतृत्वामुळे बँकेच्या कामकाजाला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पदभार स्वीकारताना चंद्रशेखर घुले यांनी सर्व संचालकांचे आभार मानत बँकेच्या प्रगतीसाठी आणि शेती व सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी काम करण्याचा संकल्प व्यक्त

## डीकास्ट झालेले पुरोगामी विचारवंत डॉ. आनंद करंदीकर यांना श्रद्धांजली

### पुण्यात अभिवादन सभेचे आयोजन



**पुणे । प्रतिनिधी**

डीकास्ट झालेले पुरोगामी विचारवंत, लेखक आणि कार्यकर्ते डॉ. आनंद करंदीकर यांना अभिवादन करण्यासाठी पुण्यात विविध पुरोगामी संस्था व संघटनांच्या वतीने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. श्रमिक भवन येथे झालेल्या या सभेला विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते आणि अभ्यासकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली. सभेच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका आणि डॉ. करंदीकर यांच्या सहकाऱ्या सरिता आवाड होत्या.

सभेत अन्वर राजन, अनंत फडके, धम्मसंगिनी रमा गोरख, मुक्ता मनोहर, विशाल विमल, त्रिवेणी गव्हाणे, सुदर्शन चखाले, विनोद शिरसाठ, गीताली वि. म., शमसुद्दीन तांबोळी, अनिकेत माळी, अच्युत गोडबोले, इब्राहिम खान, अजित अभ्यंकर, किशोर ढमाले, अनिकेत साळवे, प्रशांत कांबळे, रूपाली जाधव, दत्ता देसाई, प्रियदर्शन सहस्त्रबुद्धे, भूषण भुजबळ आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

**जातीअंतासाठी समर्पित आयुष्य**

डॉ. आनंद करंदीकर हे आयुष्यभर जातीअंत, सामाजिक न्याय आणि मानवमुक्तीसाठी लढणारे पुरोगामी विचारवंत म्हणून ओळखले जातात.

## शांघाय विमानतळावर भारतीय महिलेला रोखलं,

### ‘‘अरुणाचल चीनचा भाग’’ म्हणत पासपोर्ट नाकारला

**नवी दिल्ली । रयत समाचार**

युनायटेड किंगडममध्ये राहणाऱ्या आणि अरुणाचल प्रदेशात जन्मलेल्या भारतीय वंशाच्या प्रेमा वांगजॉम थोंगडोक यांना चीनच्या शांघाय विमानतळावर इमिग्रेशन अधिकाऱ्यांकडून तब्बल १८ तास रोखण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ‘‘अरुणाचल प्रदेश हा चीनचा भाग आहे, त्यामुळे तुमचा भारतीय पासपोर्ट वैध नाही,’’ असे सांगत चीनी अधिकाऱ्यांनी त्यांचा पासपोर्ट जप्त केला आणि जपानला जाणाऱ्या त्यांच्या पुढील उड्डाणालाही परवानगी दिली नाही. प्रेमा लंडनहून जपानला जात असताना शांघाय विमानतळावर तीन तासांचा ट्रांझिट होता. परंतु, इमिग्रेशन तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांनी थेट सांगितले की ‘‘अरुणाचल प्रदेश भारताचा नाही, तो चीनचा भाग आहे.’’ यानंतर त्यांना १८ तास विमानतळावरच ठेवण्यात आले. पुरेशी माहिती किंवा मदत न देताच त्यांच्याकडील पासपोर्ट, खाद्यपदार्थ, हालचाल करण्याची परवानगी आणि फ्लाइट सेवांवरही मर्यादा लादल्या गेल्या. प्रेमा यांनी सांगितले की, काही अधिकाऱ्यांनी त्यांची चेष्टा करत ‘‘चीनी पासपोर्टसाठी अर्ज का करत नाही?’’ अशी टिप्पणी केली. तसेच, चायना ईस्टर्न एयरलाइन्सच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना फक्त त्यांच्या विमान कंपनीचं तिकिट खरेदी करण्यासाठी दबाव टाकला आणि पासपोर्ट परत मिळवण्यासाठी त्याच अटी घातल्या. या दरम्यान त्यांच्या फ्लाइट, हॉटेल आणि बुकिंगचे मोठे नुकसान झाले. शेवटी मधील एका मित्राच्या मदतीने त्यांनी भारतीय दूतावासाशी संपर्क साधला. भारतीय अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून पासपोर्ट परत मिळवून दिला आणि जपानच्या पुढील प्रवासाची व्यवस्था केली. प्रेमा यांनी भारत सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्रालयाकडे याबाबत औपचारिक तक्रार केली आहे.

# तपोवन रोडवर नवीन बाजारपेठ उभारली जात आहे- संपत बारस्कर

## बंद पाईप व रस्ता काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ



**अहमदनगर । रयत समाचार**
सावेडी उपनगरातील प्रभाग क्रमांक १ हा झपाट्याने विकसित होणारा भाग असून येथे मूलभूत सुविधा आणि नियोजनबद्ध विकासकामांना गती मिळत आहे. या प्रभागातील दक्षता कॉलनी येथे बंद पाईप टाकणे आणि रस्ता काँक्रिटीकरण या कामांचा शुभारंभ माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून संपन्न झाला.

या वेळी बोलताना संपत बारस्कर म्हणाले, ''प्रभागातील कामे पुन्हा पुन्हा करावी लागू नयेत म्हणून प्रथम जमिनीअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या लाईन आणि ड्रेनेज लाईन पूर्ण केल्या जातात. त्यानंतरच रस्ता काँक्रिट केला जातो. प्रभागातील बदल आणि वाढता विकास पाहून नागरिक मोठ्या संख्येने येथे स्थायिक होत आहेत. पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले असून कचरा डेपोचा प्रश्नही सोडवला आहे. भविष्यात तपोवन रोडचे काँक्रिटीकरण हाती घेतले जाणार असून येथे नवीन बाजारपेठ निर्माण होत आहे.''

पुढे ते म्हणाले, ''प्रभागाच्या विकासकामांसाठी आमदार संग्राम जगताप यांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळे डीपी रस्त्यांची कामे मार्गी लागली असून दळणवळणाची सुविधा मोठ्या प्रमाणात सुधारली आहे. नागरिकांनीही विकासकाम करणाऱ्यांना साथ द्यावी.''

कार्यक्रमास माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, माया कोल्हे, सतीश ढवण, स्वप्निल ढवण आदी उपस्थित होते.

डॉ. सागर बोरुडे म्हणाले, ''प्रभागाच्या नावाप्रमाणे प्रभागाला खऱ्या अर्थाने एक नंबरचा करायचे आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळे प्रभागाचा कायापालट झाला आहे. सर्वांत मोठ्या विस्ताराचा प्रभाग असल्यामुळे तातडीने सुविधा उपलब्ध करण्यावर भर दिला जात आहे. आमदार जगताप व संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून भरघोस निधी उपलब्ध झाल्याने विकासकामांना गती मिळाली आहे.''

## मनपाला दुप्पट उत्पन्न मिळणार?

# रस्ता बाजू शुल्क वसुलीसाठी ठेकेदाराची नियुक्ती

**अहमदनगर । प्रतिनिधी**
महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्याच्या कडेला स्टॉल किंवा हातगाड्यांद्वारे विक्री करणाऱ्या सर्व प्रकारच्या विक्रेत्यांकडून रस्ता बाजू शुल्क वसूल करण्यासाठी पुन्हा ठेकेदार संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. आज ता. २५ नोव्हेंबरपासून नव्या संस्थेकडून वसुलीची प्रक्रिया सुरू होणार असून महापालिकेला यातून वार्षिक सुमारे २० लाख रुपये उत्पन्न मिळण्याचा अंदाज आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी व्यक्त केला.

यापूर्वी जुनी ठेकेदार संस्था बंद झाल्यानंतर मार्केट विभागामार्फत ही वसुली केली जात होती. त्या काळात महापालिकेला १० ते १३ लाख रुपये इतके उत्पन्न मिळत होते. शहरातील भाजीपाला, फळ विक्रेते तसेच रस्त्यावर विविध वस्तूंची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांकडून हे शुल्क आकारले जाते.

हे काम मे. वंशिका एन्टरप्रायजेस यांना एका वर्षासाठी सोपविण्यात आले असून त्यांच्याकडून वार्षिक सुमारे २० लाख रुपये (जीएसटीसह) इतके उत्पन्न मनपाला मिळणार आहे. महापालिका कर्मचाऱ्यांकडून २०२३-२४ मध्ये १३.५० लाख तर २०२४-२५ मध्ये १० लाख रुपये शुल्क वसूल झाले होते.

या नव्या व्यवस्थेमुळे मनपाच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



**नवीन शुल्क रचना ...**
५X४ फुटापर्यंत जागा वापरणाऱ्या विक्रेत्यांसाठी १० रुपये प्रति दिवस
अधिक जागेसाठी प्रति चौरस फूट १ रुपये
सायंकाळी विक्रेत्यांसाठी १५ रुपये प्रति दिवस
यापुढील जागेसाठी प्रति चौरस फूट १ रुपये
स्लॉटर शुल्क : प्रति नग ५ रुपये

# वृत्तपत्र विक्रेत्यांकडून गोंदवले दिंडीचे उत्साहात स्वागत



**अहमदनगर । विजय मते**
सावेडी उपनगरातील शिलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज सेवाभावी मंडळातर्फे यंदाही नगरगोंदवले दिंडीचे भव्य आयोजन करण्यात आले. रविवारी सकाळी भक्तिमय वातावरणात दिंडीचे प्रस्थान झाले. पहाटे श्रींच्या पादुकांवर अभिषेक करून त्या पालखीत स्थापित करण्यात आल्या. पादुकांची पूजा माजी नगरसेवक निखिल वारे यांच्या हस्ते पार पडली.


शिलाविहारमधून दिंडी प्रस्थान झाल्यानंतर मार्गावर वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध समाजसेवेचे उपक्रम राबविण्यात आले. कोठला चौकात खांडरे परिवाराच्या वतीने सर्व वारकऱ्यांना चहाबिस्कीट वाटप करण्यात आले. पुढे कायनेटिक चौकात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या वतीने दिंडीचे विशेष स्वागत करण्यात आले. विक्रेत्यांनी वारकऱ्यांचे सत्कारपूर्वक स्वागत करून दिंडीस आर्थिक योगदानही दिले. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ झाल्याचे उपस्थितांनी सांगितले.

या प्रसंगी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे उपाध्यक्ष संजय गोरे, प्रमोद पंतम, शरद बेरड, सुभाष काकडे, प्रमोद पाठक, राहुल लिमये, प्रसिद्ध प्रमुख विजय मते आदी पदाधिकारी व विक्रेते उपस्थित होते. तसेच सुभाष लुणीया परिवाराच्या वतीने सर्व वारकऱ्यांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले.

दिंडी चालक रेखाताई रिंगणे म्हणाल्या, ''या वर्षी दिंडीला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. दरवर्षी नगर शहर व उपनगरातील वृत्तपत्र विक्रेते मनापासून योगदान देतात. त्यांच्या सहकार्यामुळे दिंडीची सेवा वर्षागणिक अधिक भक्कम होत आहे.''

वारकरी, विक्रेते आणि नागरिकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण मार्ग अभंगगायन, टाळमृदुंग नाद आणि भक्तिभावाने दुमदुमून गेला. श्रद्धा, सेवा आणि समर्पणाने सजलेली गोंदवले दिंडी पुढील मार्गाला रवाना झाली.

# टेंभी डोंगरावर चंपाषष्ठी यात्रेसाठी जय्यत तयारी



**नगर तालुका । रयत समाचार**
पिंपळगाव माळवी येथील टेंभी डोंगर (शिव मल्हार गड) परिसरात चंपाषष्ठी यात्रेची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. शनिवार, ता. २२ नोव्हेंबर रोजी गावातील भक्तगण पारंपरिक उत्साहात कावड यात्रेसाठी प्रवरासंगम येथे रवाना झाले.

नगर शहरापासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेला टेंभी डोंगर ऐतिहासिक महत्त्व राखतो. येथे शिवकालीन पुरातन खंडोबा मंदिर असून पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या पुढाकाराने मंदिराचा जीर्णोद्धार, रंगरंगोटी, कळस प्रतिष्ठापना, वृक्षारोपण तसेच पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

चंपाषष्ठी निमित्त बुधवार, ता. २६ रोजी सकाळी जलाभिषेक, होम, अश्वपूजन, तसेच गावातील काठी मिरवणूक काढण्यात येणार असून दिवसभर महाजागरणाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते सायं. ५ या वेळेत अजित बोरा व धनगरवाडी पायी दिंडी सोहळा यांच्या वतीने महाप्रसाद वाटप केले जाणार आहे.

टेंभी डोंगराच्या पायथ्याशीच ऐतिहासिक पिंपळगाव तलाव व मेहरबाबा आश्रम असल्याने हा परिसर नगर शहरातील नागरिकांसाठी महत्त्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून लोकप्रिय झाला आहे. तसेच प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या रविवारी येथे अन्नदान करण्यात येते. या चंपाषष्ठी यात्रेत पंचक्रोशीतील तसेच नगर शहरातील भक्तांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन खंडोबा देवस्थान यात्रा कमिटी व शिव मल्हार सेवेकरी मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वेताळ बाबा भंडारा उत्सव उत्साहात

## आमटी – भाकरीच्या महाप्रसादाची भाविकांना पर्वणी



**नगर तालुका । रयत समाचार**
नेप्ती पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री वेताळ बाबा महाराजांच्या भंडारा उत्सवाचा सोहळा भक्तीमय वातावरणात उत्साहात पार पडला. श्री वेताळ बाबा मित्र मंडळ आणि द किंग ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या भव्य उपक्रमाचे यंदाचे हे नववे वर्ष असल्याची माहिती रामदास फ ुले यांनी दिली.

पहाटे ध्वजारोहण, सहा हजार कळस अभिषेक, पुष्पार्चन व हवन अशा धार्मिक विधींनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. सायंकाळी महाआरतीनंतर महाप्रसाद सोहळ्याला प्रारंभ झाला. आमटी, भात, शिरा आणि पारंपरिक बाजरीची भाकरी यांचा महाप्रसाद हजारो भाविकांनी लाभला. नेप्तीच्या या भंडाऱ्याचे आकर्षण असलेली आमटीभाकरी परंपरा यंदाही उत्स्फूर्तपणे जपली गेली. मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवून 'सार्वजनिक स्वच्छता हीच सेवा' असा संदेश देण्यात आला. परिसर फुलांनी, रोषणाईने आणि आकर्षक रांगोळ्यांनी सजवण्यात आला.

वेताळ बाबा मित्र मंडळातील सदस्यांनी वेताळ बाबा महाराजांचा अभिषेक करून सेवाभाव जपला.

भंडारा वाटपाचा शुभारंभ गुरुवर्य औघड पीर नौमिनाथ, गुरु योगी सोमवारनाथ महाराज, पंथ संतनाथ यांच्या हस्ते व संदीप पवार महाराज यांच्या आशीर्वादाने झाला. यावेळी विविध नाथयोगी संत, मान्यवर आणि भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नेप्तीचे माजी सरपंच अंबादास पुंड, समता परिषदेचे पदाधिकारी, मंडळाचे अध्यक्ष तुषार भुजबळ, प्रा. भाऊसाहेब पुंड, सागर शिंदे, नितीन पुंड, नितीन शिंदे, तेजस नेमाने, संकेत भुजबळ, आणि ग्रामस्थांसह समस्त नाथयोगी परिवाराने योगदान दिले.

गुरु योगी सोमवारनाथ महाराज म्हणाले, ''अन्नदानाला भारतीय संत परंपरेत सर्वोच्च महत्त्व आहे. भंडाऱ्यांसारख्या उपक्रमांमुळे समाजात प्रेम, ऐक्य आणि बंधुभाव वाढतो.'' तरुणांनी मोठ्या उत्साहाने सेवा बजावत या परंपरेस अधिक बळ दिल्याचेही त्यांनी सांगितले.

रात्री झालेल्या भजन, गवळण व भक्तीगीतांनी संपूर्ण परिसर भक्तिरंगात रंगून गेला. भाविकांच्या मोठ्या सहभागामुळे श्रद्धा, भक्ती आणि आनंदाचा संगम घडवत भंडारा उत्सवाची सांगता झाली.

# विकासाचा अजेंडा घेऊन जनतेसमोर जाणार- शेलार

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**
नगरपरिषद निवडणुकीत शहराच्या सर्वांगीण विकासाचा भक्कम अजेंडा घेऊन मतदारांपुढे जाणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते घनश्याम अण्णा शेलार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. श्रीगोंद्याचा विकास बारामतीच्या धर्तीवर करण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शेलार म्हणाले, ''शहराला भ्रष्टाचारमुक्त, भयमुक्त आणि शांततेचे वातावरण देण्यासाठी शहरातील जनतेच्या इच्छेनुसार उच्च शिक्षित, स्वच्छ प्रतिमा असलेले उमेदवार आम्ही दिले आहेत. शहरासाठी चांगल्या दर्जाचे रस्ते, स्वच्छहरित वातावरण, शुद्ध व पूर्ण दाबाने पाणी, आधुनिक उद्याने, वॉकिंग ट्रॅक, मुलांसाठी खेळाची मैदाने, ओपन जिम, ग्रंथालय व अभ्यासिका आदी सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा निर्धार आहे.''



ते पुढे म्हणाले, ''बारामतीच्या धर्तीवर सरस्वती नदी आणि लेंडी नाल्याचे सुशोभीकरण व विकास करण्यात येणार आहे. गावांप्रमाणे वाडीवस्त्यांवरील नागरिक कर भरतात, परंतु शहरासारख्या सुविधा त्यांना मिळत नाहीत. त्या सुविधा देणे हे आमचे प्राधान्य आहे.''

श्रीगोंदा शहराला 'दक्षिण काशी' म्हणून ओळख मिळाल्याचा उल्लेख करताना शेलार म्हणाले, ''शहरातील १०८ मंदिरे ही आपली सांस्कृतिक ओळख आहे. या मंदिरांचा जिर्णोद्धार करून श्रीगोंदाला धार्मिक व ऐतिहासिक दृष्ट्या पुढे आणण्याचा आमचा प्रयत्न असेल.''

शेलार यांनी शिवसेना आणि भाजपवर टीका करताना म्हटले की, ''एकमेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्या या पक्षांनी आलेला निधी मिळून भ्रष्टाचारासाठी लुटल्याचे झटकता येणार नाही. त्यामुळे भ्रष्टाचारमुक्त व भयमुक्त शहर घडवण्यासाठी नागरिकांनी आमच्या उच्च शिक्षित आणि स्वच्छ प्रतिमा असलेल्या उमेदवारांना विश्वास द्यावा.''

# पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## सुधागड विद्या संकुलचा उपक्रम

**नवी मुंबई । सोपान अडसरे**
परतीच्या मान्सून पावसाने राज्यातील घाटमाथा परिसरासह अनेक जिल्ह्यांना तडाखा दिला असून, बीड जिल्ह्यातील शाळा व विद्यार्थ्यांच्या घरांमध्ये पाणी शिरून मोठे नुकसान झाले आहे. यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य पाण्यात भिजून नष्ट झाले. या परिस्थितीची जाणीव ठेवून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मदतीचे आवाहन केले होते.



या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत, विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात शैक्षणिक साहित्य जमा केले. खोडरबरपासून दप्तरापर्यंतचे सर्व साहित्य एकत्र करून जवळपास ३०० किट्स तयार करण्यात आल्या. ही किट्स २४ मोठ्या बॉक्समध्ये पॅक करून महसूल विभागाचे तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांच्या मार्फत बीड जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांच्या कडे सुपूर्द करण्यात आली.

बीड जिल्ह्यातील नागरिकांचे शेती, घरे, व्यवसाय यांचे मोठे नुकसान झाले असताना विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कळंबोली येथील सुधागड विद्या संकुल पुढे सरसावले. या वेळी जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी प्राचार्य पालवे, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कौतुक करत प्रशस्तीपत्र देऊन आभार मानले.सुधागड विद्या संकुलाची ही मानवीय मदत बीडसह रायगड जिल्ह्यातही कौतुकास्पद ठरत आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
* अधिक माहितीसाठी संपर्क *
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

# फडणवीस-शिंदे-पवारांवर लाडक्या बहिणी नाराज

## गरजूंनाही लाभ मिळू द्या

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

लाडक्या बहीण योजनेपासून राज्यात आजही लाखो महिला वंचित आहेत. या महिलांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अवमान केला आहे. या योजनेपासून महिलांना वंचित ठेऊन त्यांना सापत्न वागणूक देत आहेत. यामुळे आपली थट्टा होत असल्याची भावना व्यक्त केली आहे. लाडक्या बहीण योजनेचा खऱ्या गरजूंना लाभ देण्यात यावा अशी मागणी आता होऊ लागली आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकी अगोदर राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना थाटामाटात सुरू केली. अत्यंत घाईगडबडीत आणि कोणतेही निकष न लावता साधे फॉर्म भरून देणाऱ्यांनाही महिन्याकाठी पंधराशे रुपये देण्यात आले. प्रारंभी ही योजना अतिशय चांगली असल्याची भावना महिलांमध्ये रुजवली गेली. निवडणुकीनंतर मात्र त्यासाठी वेगवेगळे निकष लावले. निवडणुकी अगोदरच राज्यभरात हे फॉर्म भरून घेण्याचे काम सुरू असतानाच मध्येच हे काम थांबविण्यात आले. योजनेसाठी अनेक महिला आजही पात्र आहेत. मात्र महायुती सरकार नवीन फॉर्म भरून घेण्यासाठी चालढकल करीत आहे. योजनेचा फायदा तळागाळातील ही महिलांना मिळाला पाहिजे, अशी मागणी हजारो महिलांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी कोणताही अभिनवेश न बाळगता तात्काळ या योजनेपासून वंचित असलेल्या महिलांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी तातडीने फॉर्म भरून घेणे सुरुवात करावी, अशी मागणी ही महिलांनी केली आहे. या योजनेचा फायदा काहींना मिळत आहे तर आजही अनेक महिला त्यापासून वंचित आहेत. यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार महिलांची थट्टा करीत असल्याची भावना त्यांच्यामध्ये निर्माण झाली आहे. यामुळे महिलांमध्ये महायुतीतील या तिघा मंत्र्यांबद्दल प्रचंड नाराजी पसरली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वंचित महिलांसाठी तातडीने फार्म भरून घेत या लाडक्या बहीण योजनेचा त्यांना तातडीने हप्ता सुरू होईल, अशा पद्धतीने उपाययोजना आणि आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी महिलांकडून होत आहे.

पर्यटन विकासाला गती

# मोहटादेवी देवस्थान ट्रस्टमध्ये ॲड. वाडेकर यांची पुनर्नियुक्ती

**पाथर्डी । प्रतिनिधी**

अखिल महाराष्ट्रातील भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या श्रीमोहटादेवी देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तपदी नोटरी पब्लिक ॲड. विक्रम वाडेकर यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांच्या निवडीचे भाविकवर्गासह विविध सामाजिक संस्थांकडून उत्स्फूर्त स्वागत होत असून, अहिल्यानगर वकील संघानेही त्यांचा विशेष गौरव केला. नियुक्तीनंतर ॲड. वाडेकर यांनी गड परिसराच्या भावी विकासाचे व्यापक चित्र समोर ठेवत पर्यटन केंद्रित प्रकल्पांना चालना देण्याचा संकल्प व्यक्त केला. मोहटादेवी गडाचा ऐतिहासिक वारसा, धार्मिक महत्त्व आणि नैसर्गिक सौंदर्य लक्षात घेता येथे मोठ्या प्रमाणावर भाविक व पर्यटक भेट देतात. त्यामुळे गड परिसराचे नियोजनबद्ध, आकर्षक आणि आधुनिक रूपांतर अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गडावरील ऐतिहासिक वास्तूंचा वारसा जतन करत त्यांची संरक्षणात्मक उभारणीही प्राधान्याने केली जाईल, असे त्यांनी नमूद केले. या उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी चेअरमन, विश्वस्त मंडळ, कर्मचारीवर्ग आणि मोहटा ग्रामस्थांचे सक्रीय सहकार्य घेतले जाणार आहे. ॲड. विक्रम वाडेकर यांच्या पुनर्नियुक्तीमुळे देवस्थानाचा सर्वांगीण विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास भाविकवर्गाने व्यक्त केला आहे.

### वाडेकर यांचा विकास आराखडा

ॲड. वाडेकर यांनी विकास प्रकल्पांना प्राधान्य देण्याची घोषणा केली आहे. त्यात गड परिसराचे आधुनिक पर्यटन स्थळ म्हणून उभारणी. भाविकांसाठी अधिक सुविधायुक्त व भव्य भक्तनिवास. सुलभ दर्शन मार्ग, स्वच्छता, सुरक्षा आणि मूलभूत सुविधांचा विस्तार. परिसराचा हरित विकास. वाढीव पार्किंग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि बसण्यासाठी प्रशस्त जागा आदींचा समावेश आहे.

# मांजरसुंबा शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक साहित्य वाटप



**नगर तालुका । रयत समाचार**

"समाजात राहून समाजाचे काहीतरी देणे लागते," या भावनेतून आदर्श गाव मांजरसुंबा आणि शेजारील डोंगरगण ग्रामस्थांनी माजी खासदार डॉ. सुजय विखे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला. डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तसेच पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपणाचा उपक्रमही राबविण्यात आला. कार्यक्रमास माजी सरपंच कैलास पठारे, जालिंदर कदम, ऋतुजा कदम, संतोष पठारे, सर्जेराव मते, पोपट गायकवाड, चंद्रभान कदम, धोंडीराम कदम, बाळासाहेब कदम, खाशेराव साबळे, विलास भुतकर, इंद्रभान कदम, नामदेव कोकाटे, अक्षय कदम, कांताबाई भुतकर, मुख्याध्यापक यशवंत भुतकर तसेच पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जालिंदर कदम म्हणाले, " डॉ. सुजय विखे यांनी मतदारसंघात विकासाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवल्या. केंद्र शासनाच्या योजना थेट नागरिकांच्या दारापर्यंत नेण्याचे काम त्यांनी यशस्वीपणे केले. वाढदिवस, सणउत्सव साजरे करताना आपल्या संस्कृती आणि परंपरा जपणे आवश्यक आहे. याच भावनेतून डॉ. सुजय विखे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केला आहे." कैलास पठारे म्हणाले, "डॉ. विखे हे सर्वांना बरोबर घेऊन काम करणारे आणि विकासाचे स्पष्ट व्हिजन असलेले नेतृत्व आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाचे महत्त्व युवकांनी ओळखावे, यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यामुळे त्यांचा वाढदिवस विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उपक्रम राबवून साजरा केला." ऋतुजा कदम म्हणाल्या, "माजी खासदार डॉ. सुजय विखे आणि माझे वडील जालिंदर कदम यांनी केलेल्या सामाजिक कामाचा वारसा मी पुढे नेणार आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करणार आहे. नवनागापूर जिल्हा परिषद गटात उत्तम कार्य उभारण्यासाठी प्रयत्न करणार आहे. आजची तरुण पिढी वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करत असेल, तर समाजात सकारात्मक बदल घडेल."

# कोयटे यांच्यासह ३० उमेदवारांच्या अपात्रतेची मागणी फेटाळली

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव नगरपरिषद निवडणुकीत मोठ्या उत्सुकतेने पाहत असलेल्या प्रकरणाचा निकाल जाहीर झाला असून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ओमप्रकाश कोयटे आणि त्यांच्या पॅनेलमधील ३० उमेदवारांना अपात्र ठरविण्याची मागणी जिल्हा व सत्र न्यायाधीश डी. डी. अलमले यांनी फेटाळली. ता. २४ रोजी दुपारी ३.४५ वाजता निकाल जाहीर होताच आ. आशुतोष काळे यांच्या गटात जल्लोष तर माजी आ. कोल्हे गटात नाराजीचे स्वर उमटले. कोल्हे गटाच्या वतीने दाखल केलेल्या अपीलमध्ये १५ नोव्हेंबर रोजी दाखल केलेल्या शपथपत्रांवर शेवटच्या सह्या नसल्याचा, काही ठिकाणी मजकूर अपूर्ण असल्याचा, तसेच छाननीनंतर मजकूर भरल्याचा आरोप करण्यात आला होता. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयातील आदेशांकडे दुर्लक्ष केले, असा मुद्दाही मांडला गेला. या कारणांवरून कोयटे आणि ३० उमेदवारांचे अर्ज सदोष ठरवावेत, अशी मागणी ॲड. जयंत जोशी आणि ॲड. एस. एम. वाघ यांनी केली होती. त्यांनी सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील विविध निर्णयांचा दाखला देऊन २३ नोव्हेंबर रोजी दिवसभर आणि २४ नोव्हेंबर रोजी सकाळी जवळपास एक तास युक्तिवाद केला. प्रतिवादी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठ वकील कातनेश्वर गाडे यांनी बाजू मांडली. सरकारी पक्षाकडून ॲड. अशोक वहाडणे आणि ॲड. प्रदीप रणधीर यांनी कामकाज पाहिले. सर्व युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने अपात्रतेची याचिका फेटाळली. दरम्यान, राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत २१ नोव्हेंबर होती. कोपरगावमध्ये यंदा बहुरंगी लढत पाहायला मिळत आहे. प्रमुख उमेदवारांमध्ये विजय वहाडणे, पराग संधान, ओमप्रकाश कोयटे, सपना मोरे, राजेंद्र झावरे (शिंदे गट), तसेच अपक्ष दीपक वाजे यांचा समावेश आहे. न्यायालयाच्या निकालामुळे निवडणुकीची रंगत वाढली असून सर्वांचे लक्ष आता २ डिसेंबरच्या मतदानाकडे वळले आहे.

# चौकश्या लागल्या तरी रोहित पवार यांचा संघर्ष थांबला नाही- प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे

## महाविकास आघाडी प्रचाराचा भव्य शुभारंभ

**जामखेड । रिजवान शेख**

आगामी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट), महाविकास आघाडी व मित्र पक्षांच्या वतीने प्रचाराचा भव्य शुभारंभ झाला. या शक्तिप्रदर्शनातून आघाडीने एकजुटीचा ठोस संदेश देत, यंदाची निवडणूक विकासाच्या मुद्द्यांवर लढवण्याचा निर्धार व्यक्त केला.

या वेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे म्हणाले, "जामखेड नगर परिषद निवडणुकीत सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली आहे याचे समाधान वाटते. आमच्या उमेदवारांबाबत मुस्लिम मत मिळणार नाहीत अशी अफवा पसरवत भाजप मतांची विभागणी करण्याचा प्रयत्न करत आहे; यात यश नाही मिळाले तर पैशांचा वापर करण्याचा मार्ग धरावा, अशी त्यांची प्रवृत्ती दिसते. मात्र असे होऊ देणार नाही."

पुढे बोलताना त्यांनी रोहित पवार यांचा गौरव करताना म्हटले, "सगळ्या चौकश्या लागल्या तरी आमचे रोहित पवार संघर्ष करत आहेत, लढा देत आहेत याचा आम्हाला अभिमान आहे."

कार्यक्रमात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे, खासदार निलेश लंके, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सचिव सुभानअली शेख यांनीही विचार व्यक्त केले.




कार्यक्रमास राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, जामखेड नगर परिषद अध्यक्षपदाच्या उमेदवार संध्याताई शहाजी राळेभात, नगर परिषदेचे सर्व उमेदवार, जिल्हा बँक संचालक अमोल राळेभात, माजी सभापती सूर्यकांत मोरे, तसेच विश्वनाथ राऊत, रमेश अजबे, मंगेश अजबे, शिवाजी ढवळे, नाना कोल्हे, नय्यूमभाई सुभेदार, किसन ढवळे, शहाजी पाटील, राजेंद्र पवार, नरेंद्र जाधव, भानुदास बोराटे, संजय वराट, रशीद शेख यांसह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार तालुकाध्यक्ष विजयसिंह गोळेकर यांनी मानले.

# आनंद शिंदे यांनी पंकजा मुंडे यांच्यावर गायिलेल्या गीताचा भाजपाला आधार

## 'यथा प्रजा तथा राजा' हा नवा लोकप्रवाद रुढ होतोय

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी** : पाथर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीत एव्हाना म्हणावा असा रंग भरलेला नाही. सदर लेख प्रसिद्ध होईपर्यंत, भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अभय आव्हाड यांच्या उमेदवारीवर हरकत घेतलेला निकाल कदाचित लागलेलाही असेल. तोपर्यंत या निवडणुकीत एक प्रकारचा जाणवत असलेला निरसपणा तसाच राहिल. परंतु, दीर्घकाळ नगर परिषदेच्या सत्तेत राहूनही विकास कामांऐवजी भाजपाला लोकनेत्री पंकजा मुंडे यांच्यावर, आनंद शिंदे यांनी गायिलेल्या गीताचा आधार घ्यावा लागत आहे.







विधानसभा निवडणुकीत गायक आनंद शिंदे यांच्या आवाजातील लोकनेत्री पंकजा मुंडे यांच्यावरील व आमदार मोनिका राजळे यांच्या विधानसभेच्या निवडणुकीत ऐकलेल्या गीतांच्या कॅसेट, नगर परिषदेच्या प्रचारात मतदारांचे लक्ष वेधून घेत आहेत. लोकनेत्री पंकजा मुंडे यांचा पाथर्डी तालुक्यातील मतदारांवर भावनिक पगडा आहे. पाथर्डी शहरातील मतदारांवर, पंकजा मुंडे यांच्यासह या गाण्यानेही चांगलीच भुरळ घातली आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात अनेकांनी या गाण्यांच्या क्लिप्स रिंगटोन म्हणूनही ठेवल्या होत्या. वादळ वारा पाऊस धारा... संकटांचा येऊ दे मारा... समाजसेवा एकच नारा... सोंग्या ढोंग्या ला नाहीच थारा... मार्ग भला मिळाला मला... विचार ना बळाचा... पंकजाताई बाग फुलविते, बीजेपीच्या कमळाचा... उडत्या चालीच्या गाण्याने पुन्हा एकदा मतदारांना भावनिक करण्याचा प्रयत्न होत आहे. आचारसंहितेचा फारसा प्रभाव नसल्याने जेवणावेळी व अन्य खर्चांना फारसा काही प्रतिबंध दिसत नाही.

लोकनेत्री पंकजा मुंडे यांचा प्रभाव तालुक्यावर असला तरी शहरात जातीय समीकरणे विचारात घेता अशा पद्धतीच्या गाण्यांना प्रचारात किती वापरावे याबद्दल खुद्द भाजपाचेच कार्यकर्ते दबक्या आवाजात चर्चा करत आहेत. याऐवजी नगर परिषदेत सत्ता असताना विकास कामांवर आधारित केलेला प्रचार मतदानाच्या दृष्टीने अधिक परिणामकारक ठरला असता, असा सूर आता भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. आमदार मोनिका राजळे यांच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांत कोट्यवधींची विकासकामे झाली. परंतु, या कामांपेक्षा, त्यांचा दर्जा व त्यांत झालेल्या भ्रष्टाचाराचीच चर्चा जास्त होत आहे. नगर परिषदेची निवडणूक नागरिकांना पायाभूत सुविधा निर्माण करुन देण्यासाठी लढवली जात नसून ती ठेकेदारीसाठी लढवली जात आहे, असा आरोप विरोधकांकडून होत आहे. काही जागरुक मतदारांत, गेल्या काही वर्षांत सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टांची चर्चा होताना ऐकायला येत असली तरी त्यांची संख्या नगण्य आहे. त्यामुळे, लोकांना खरोखरच विकास व पायाभूत सुविधांची गरज आहे की ऐनवेळी ठेवल्या जात असलेल्या बडदास्तीची गरज आहे, हे कळायला मार्ग नाही.

शहराचा दीर्घकालीन विचार करुन सोयी -सुविधा करणं गरजेचं असताना, नव्याने आलेल्या योजना राबविण्यासाठी जुन्या पायाभूत सुविधांची झालेली दुर्दशाही लोक विसरतात, हे सत्य आहे. गेल्या पावसाळ्यात झालेले लोकांचे हाल, शहरात मुताऱ्यांचा अभाव, पार्किंगची व्यवस्था नसल्याने असह्य होत असलेली वाहतूक कोंडी, वाणिज्यिक वापरासाठी बांधलेल्या इमारतींना बेकायदेशीरपणे दिली गेलेली पूर्णत्वाची प्रमाणपत्रे, स्ट्रीट लाईटमध्ये झालेला भ्रष्टाचार, शहरातील दोन्ही बस स्थानकांवर असलेला चोरांचा सुळसुळाट, शाळा-महाविद्यालयांसमोर चालणारा रोडरोमिओंचा हैदोस, कर्कश आवाजात वाजवले जाणारे डीजे, रस्त्यावर साजरे होत असलेले वाढदिवस अशा कितीतरी समस्या नागरिकांच्या विस्मरणात जातात. त्यांची पूर्तता व बंदोबस्ताची दिलेली आश्वासनेही अडगळीत पडतात. नागरिक हे सारं काही विसरुन निवडणुकांना सामोरं जातात आणि परत पहिले पाढे पंचावन्न, हे ठरलेलेच असते.

शहरात मोकाट जनावरांचा सुळसुळाट हा नव्याने निर्माण झालेला गंभीर प्रश्न आहे. भर रस्त्यांवर मोकाट जनावरे नागरिकांवर हल्ले करतात. नगर परिषदेवर अनेक वर्षे प्रशासकराज असले तरी त्यांच्यावर लोकप्रतिनिधींचा अंकुश असायला हवा होता. विशेष म्हणजे प्रशासकीय कालखंडातही ठराविक ठेकेदारांनाच विकासकामांचे ठेके दिले गेल्याने, अनेक ठेकेदारांनी निकृष्ट दर्जाची कामे केली आहेत. हे सर्व होत असतानाही विरोधी नगरसेवकांनी प्रखर विरोध करणे गरजेचे होते. तसे न झाल्याने ठेकेदारांनाही मोकळे रान मिळाले. सध्या सुरू असलेल्या पाईप लाईनच्या कामामुळे उद्ध्वस्त झालेले रस्ते पूर्ववत करुन देण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदारावर असूनही सदर ठेकेदार गुजरातचा असल्याने त्याला जाब विचारला गेला नाही. त्यामुळे त्याने थातुरमातुर पद्धतीने रस्ते दुरुस्त केल्याचे वास्तव आहे. तरीही नागरिक गपगुमान बसत असल्याने राज्यकर्त्यांचीही भीड चेपली जाते. त्यामुळेच यथा राजा तथा प्रजा या लोकप्रवादाऐवजी, यथा प्रजा तथा राजा, हा नवाच लोकप्रवाद रुढ होत आहे.

### किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

# यंत्रणा लागल्या कामाला




**श्रीरामपूर** – नगरपालिकेची निवडणूक आता अवघ्या आठ दिवसांवर येऊन ठेपली आहे.उमेदवारांनी घरोघरी मतदारांच्या गाठीभेटी घेण्याची एक फेरी पूर्ण करून आता दुसरी फेरी सुरू केली. महायुती व आघाडी यांच्या वतीने प्रत्येक वार्डामध्ये नियोजन केले जात आहे. भाजप राष्ट्रवादीची आघाडी असल्याने व भाजपची धुरा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे असल्यामुळे प्रवरेची यंत्रणा आता शहरात नियोजनाला लागली. प्रत्येक प्रभागामध्ये मतदारांची माहिती घेतली जात असून मतदानाचे नियोजन करण्यासाठी कार्यकर्त्यांचे देखील नियोजन करण्यात येत आहे .

दुसरीकडे काँग्रेस आघाडीची सुद्धा यंत्रणा कार्यरत आहे. ग्रामीण भागातील कार्यकर्ते शहरांमध्ये फिरत आहेत. परिस्थितीचा अंदाज घेत आहेत व त्या पद्धतीने पक्षश्रेष्ठींना अहवाल देत आहेत. एकनाथ शिंदे सेनेचे ग्रामीण भागातील कार्यकर्ते सुद्धा शहरामध्ये फिरताना दिसून येत आहेत. एकूणच सर्वच पक्षांच्या यंत्रणा कामाला लागल्या असून मतदानाच्या दिवशी जास्तीत जास्त मतदान कसे घडवून येता येईल याबाबतचे सूक्ष्म नियोजन केले जात आहे. मतदारांना मात्र यावेळी मागील निवडणुकांपेक्षा वेगळा अनुभव येत आहे.

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राष्ट्रीय राजकारणातले द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा आज स्मृतिदिन. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए – एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले.

महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीतही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ सालच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली यशवंतरावांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले अशावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून त्यांची देशाच्या संरक्षणमंत्री नेमणूक केली. परकीय आक्रमणाच्या वेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पेलली.

१९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरित्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तणखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाच्या उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले.

महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्वल केले.

यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षात्मक लेख, पत्रलेखन भाषणे, इत्यादी स्वरूपात त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हा मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत.

यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारतील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# भुईकोटकिल्ला मैदानावर गॉडविन कप फुटबॉल स्पर्धेला प्रारंभ

**अहमदनगर।रयतसमाचार**

जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे माजी सचिव दिवंगत गॉडविन डिक यांच्या स्मरणार्थ आयोजित गॉडविन कप २०२५ फुटबॉल स्पर्धेला भुईकोट किल्ला मैदानावर सुरुवात झाली. फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी, जिल्हा फुटबॉल असोसिएशन आणि डिक परिवार यांच्या पुढाकारातून ही स्पर्धा दुसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आली आहे. उद्घाटन प्रसंगी गॉडविन डिक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून फुगे सोडण्यात आले. यावेळी जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष खालिद सय्यद, सचिव रोनाप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, सदस्य व्हिक्टर जोसेफ तसेच अकॅडमीचे सदस्य आणि खेळाडू उपस्थित होते.



फुटबॉल क्षेत्रातील गॉडविन डिक यांच्या योगदानाची आदरांजली म्हणून ही स्पर्धा साजरी होत असून, जिल्ह्यात फुटबॉल संस्कृती बळकट करण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचा प्रतिसाद खेळाडू व आयोजकांकडून मिळत आहे.

या वर्षी स्पर्धेत १२ संघ सहभागी झाले असून आठवडाभर सामने रंगणार आहेत. जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना कौशल्य दाखवण्याची ही संधी ठरणार आहे. पहिल्या सामन्यात एनएफसीने युनिटी एफसीला ३–२ (टायब्रेकर) ने पराभूत करून पुढील फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या सामन्यात बाटा एफसी आणि फिरोदिया शिवाजीयन्स एफसी (ब) यांच्यात अटीतटीची खेळी झाली. निर्धारित वेळेत गोल न झाल्याने टायब्रेकरने बाटा एफसी विजेता ठरला.

## रमजान शाह यांचे निधन



**श्रीरामपूर । रयत समाचार**

येथील छप्पर बंद शाह समाजाचे माजी अध्यक्ष आणि बांधकाम ठेकेदार रमजान हैदर शाह यांचे आज पहाटे पावणे तीन वाजता दुःखद निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसह विविध राजकीय घटकांशी त्यांचे निकटचे संबंध होते. त्यांच्या पत्नी अख्तरबी शाह या श्रीरामपूर नगरपालिकेच्या माजी नगरसेविका आहेत.
त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, तीन मुली, एक भाऊ असा मोठा परिवार आहे.
शाह बिरादरीच्या उन्नतीसाठी रमजान शाह यांनी मोलाचे कार्य केले. उत्तम संघटक म्हणून त्यांची ओळख सर्वश्रुत होती.

# शेतकऱ्यांत बिबट्याची दहशत दिवसा पूर्णवेळ विजेची मागणी



**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्ह्यातील गावांमध्ये तसेच शेती परिसरात बिबट्या आणि इतर हिंसक प्राण्यांचा वाढता वावर गंभीर होत असून, शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न तीव्र झाला आहे. भीतीमुळे शेतकरी रात्री शेतीकामासाठी जाण्यास असमर्थ आहेत. अशा परिस्थितीत शासन व महावितरणाने जाहीर केलेला दिवसा वीजपुरवठा प्रत्यक्षात फक्त तीन तासांपुरताच मर्यादित राहत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

दिवसा मिळणारा अल्प वीजपुरवठा सिंचनावर दुष्परिणाम करत असून, पिकांची वाढ थांबणे, काम अर्धवट राहणे आणि सुरक्षेचा धोका वाढणे अशा समस्या गंभीर बनल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मंजूर केलेला ८ ते १० तासांचा दिवसा पूर्णवेळ वीजपुरवठा तातडीने सुरू करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) यांनी केली.

शेतकऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रात्रीचा वीजपुरवठा बंद ठेवून, दिवसा अखंड, स्थिर वीजपुरवठा करणे आवश्यक आहे. तसेच वीजपुरवठ्यातील अनियमितता, लोडशेडिंग, कमी व्होल्टेज यांसारख्या समस्या दूर कराव्यात आणि शेतकऱ्यांना अचूक वीज वेळापत्रक उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांचे निवेदन विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांना देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे, तालुका अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस तालुका अध्यक्ष अरुण म्हस्के, भरत बोरवे, चंद्रकांत पवार, गणेश तोडमल, महेश शेळके, युवराज हजारे सह शेतकरी उपस्थित होते.

# पै.सत्यमची सुवर्ण कामगिरी; उत्तर महाराष्ट्र केसरी स्पर्धेत आत्मा मालिकच्या मल्लांचे चमकदार प्रदर्शन

**नेवासा । विजय खंडागळे**

उत्तर महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद मान्यताप्राप्त ''१४ वी उत्तर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २०२५'' नाशिक येथे २२ आणि २३ नोव्हेंबर रोजी संपन्न झाली. अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार जिल्ह्यातील अनेक दिग्गज मल्लांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेत आत्मा मालिक कुस्ती केंद्रातील मल्लांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून आपली छाप उमटवली. विशेषतः घोडेगाव, ता. नेवासा येथील मल्ल पै. सत्यम संजय चौधरी याने ३५ किलो वजनी गटात दमदार खेळी करत सुवर्णपदक पटकावले. या विजयामुळे तो आपल्या वजनी गटात महाराष्ट्रातील सुवर्ण विजेता ठरला आहे. पै. सत्यमच्या या यशाची वार्ता घोडेगाव परिसरात पोहोताच ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोषात आनंद व्यक्त केला.



या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सचिन देसरडा (भाजपा जिल्हा उपाध्यक्ष), वसंतराव सोनवणे (चेअरमन, घोडेगाव सोसायटी), दगडू एखे, दीपक जाधव, जना सोनवणे, बाबासाहेब सोनवणे, विजय आव्हाड, बाबासाहेब वैरागर, रवी बर्डे, डॉ. सुनील वैरागर, निसार सय्यद आदी मान्यवरांनी पै. सत्यम संजय चौधरी यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

# इतर नेत्यांची शहरं भिकारचोट- अजित पवार



**बीड । रयत समाचार**

राज्यातील नगरपरिषद निवडणुकांचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून बीड जिल्ह्यातील सभेत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी विरोधकांवर थेट शब्दबाण सोडले. ''मी कामाचा माणूस आहे. आधी करून दाखवतो मग बोलतो. बाकीचे नेते, त्यांची शहरं भिकारचोट असतात,'' अशा शब्दांत त्यांनी इतर पक्षांच्या नेत्यांना लक्ष्य केले. अजित पवार बीड आणि नांदेडच्या दौऱ्यावर असताना त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयासाठी तब्बल ₹१००० कोटी निधी देण्याची घोषणा केली. तसेच बीडमध्ये सुरू केलेली रेल्वे पुढे पुणे आणि मुंबईपर्यंत नेण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. पदी–पदावर केल्याचे स्मरण करून देताना ते म्हणाले, ''मला लोकांनी सहा वेळा उपमुख्यमंत्री केलं, मंत्री केलं, विरोधी पक्षनेता केलं. आरोप झाले तरी मी स्वच्छ काम करतो. मी माझ्या भागात करून दाखवलं, म्हणूनच तुमच्याकडे येऊन सांगतो.''

नांदेडमध्ये झालेल्या सभेत त्यांनी 'लाडकी बहीण योजना'विषयीही भाष्य केले. ''कोणी सांगत असेल की आम्हाला मतदान दिलं तरच लाडकी बहीण योजना सुरू राहील, तर भीक घालू नका. हा लाडका भाऊ तुमच्या पाठीशी आहे,'' अशा शब्दांत त्यांनी महिलांना धीर दिला. नाव न घेता त्यांनी शरद पवारांच्या गटातील नेत्यांवरही चिमटे काढले. ''मागे सगळे मला उपमुख्यमंत्री पद देत होते, आज आरोप करत आहेत. हे वागणं चांगलं नाही,'' असा सल्लाही त्यांनी दिला.

# नगरपरिषदेत शिवसेनेचा पॅनेल विजयी होणार- अतुल लोखंडे



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा नगरपरिषद निवडणुकीची रणधूमाळी चांगलीच रंगली असून सर्वच पक्षांनी प्रचाराचा जोर वाढवला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेतर्फे शहरात भव्य रॅली काढण्यात आली. शेख महंमद महाराज मंदिरात नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यानंतर झालेल्या सभेत शहरातील राजकीय वातावरणाला वेगळी दिशा देणारी भाषणे झाली. श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे यांनी प्रभावी भाषण करत शिवसेनेचा विजय निश्चित असल्याचा आत्मविश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, ''माजी नगराध्यक्ष शुभांगी पोटे व मनोहर पोटे दांपत्याने गेल्या साडेसात वर्षांत शहराच्या विकासाचा वेग वाढवला. नवनवीन योजना राबवून शहराचा चेहरा बदलला. नागरिक मनोहर पोटेंच्या कामावर समाधानी असून शिवसेनेच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत.'' पुढे बोलताना विरोधकांवर टीका करत म्हटले, ''शिवसेनेच्या विरोधातील तीनही पॅनेलचे नेतृत्व शहराबाहेरील आहे. शहराच्या विकासाला अडथळा आणण्यासाठी हा डाव रचला जात आहे. मात्र नागरिकांनी हे समीकरण ओळखले आहे. त्यामुळे विजयी कौल शिवसेनेलाच मिळेल.'' लोखंडे यांनी शिवसैनिकांना मतदान होईपर्यंत पूर्ण ताकदीने प्रचारात उतरावे, असे आवाहनही केले. कार्यक्रमास नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शुभांगी पोटे, पॅनेलमधील सर्व उमेदवार, संपर्क प्रमुख सचिन जाधव, तालुका प्रमुख नंदकुमार ताडे, टिळक भोस यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. रॅलीला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाचा उल्लेख करत शिवसेना जिल्हा उपप्रमुख अनिल शिंदे यांनी आत्मविश्वास व्यक्त केला की, ''या निवडणुकीत विजय निश्चितच शिवसेनेचाच असेल.'' मनोहर पोटे म्हणाले, ''शहराचा स्वीकार आमच्या कामामुळे झाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्यामुळे श्रीगोंद्यास मोठा निधी मिळाला. पुढील काळातही विशेष निधी मिळेल, असे आश्वासनही त्यांनी दिले आहे. शहराचा विकास आणि पॅनेलमध्ये दिलेले अनुभवी तसेच उत्साही नवे चेहरे पाहता सर्व उमेदवार मोठ्या फरकाने विजय मिळवतील.''

# हॉलीबॉल स्पर्धेत इनामदार स्कूलला सुवर्ण; २० ने दणदणीत विजय



**अहमदनगर । आबीद खान**

जिल्हा स्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्यानंतर, लोकमत तर्फे आयोजित लोकमत महागेम्समध्येही पी. ए. इनामदार स्कूलच्या व्हॉलीबॉल संघाने आणखी एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली. १४ वर्षे मुलांच्या गटातील जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत पी. ए. इनामदार स्कूलच्या खेळाडूंनी दमदार खेळ करत विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात संघाने डिपॉल इंग्रजी माध्यम स्कूल, राहुरी यांचा २० असा पराभव करून प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक जिंकले. विजयी संघाचे प्राचार्य युनूस सलीम, उपप्राचार्या फरहाना शेख, संस्थेचे अध्यक्ष अब्दुल रहीम खोकर, उपाध्यक्ष इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, खजिनदार डॉ. खालीद शेख, संचालक मंडळ, एस. इंडिया फाउंडेशनचे संचालक तसेच सर्व शिक्षकवर्ग यांनी संघाचे मनापासून अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना उद्देशून बोलताना संस्थेचे उपाध्यक्ष इकबाल सय्यद म्हणाले, ''हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. सुवर्णपदक जिंकणे ही तुमची वैयक्तिक जीत नसून शिस्त, मेहनत, संघभावना आणि जिद्दीचा विजय आहे. खेळ म्हणजे केवळ स्पर्धा नसून तो स्वभाव घडवतो, विचार सकारात्मक करतो आणि लढण्याची ताकद देतो. प्रत्येक सराव, प्रत्येक घामाचे थेंब आज सुवर्णक्षणात परिवर्तित झाले आहेत.'' ते पुढे म्हणाले, ''प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे प्रोत्साहन आणि संस्थेचा विश्वास हे तुमच्या यशाचे आधारस्तंभ आहेत. हा विजय तुम्हाला पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देईल आणि तुम्ही संस्थेचे नाव आणखी उज्ज्वल कराल, अशी अपेक्षा आहे.'' या विजयानंतर क्रीडा शिक्षक रामेश्वर हारके, मार्गदर्शक इकबाल सय्यद, तसेच व्हॉलीबॉल प्रशिक्षक जुनेद सय्यद यांच्या योगदानाचे विशेष कौतुक करण्यात आले.

# आव्हाड महाविद्यालयाच्या लोखंडेची खेलो इंडिया गेम्ससाठी निवड

**पाथर्डी । नितीन गटाणी**

बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचा प्रतिभावान वजन उचलपटू संजय लोखंडे याची ५व्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२५, वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात ६५ किलो वजन गटात निवड झाली आहे. ही प्रतिष्ठित स्पर्धा यावर्षी बिकानेर, राजस्थान येथे आयोजित करण्यात आली आहे. लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, जालंधर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत प्रत्येक वजन गटामधील पहिल्या आठ सर्वोत्तम खेळाडूंची निवड करण्यात आली. त्यात संजय लोखंडेने उत्कृष्ट कामगिरी करत स्थान मिळवले. यापूर्वीही संजयने चार वेळा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वेटलिफ्टिंग संघाचे प्रतिनिधित्व केले असून, महाराष्ट्र राज्य मिनी ऑलिम्पिक स्पर्धेत रौप्य पदक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



संजयच्या या यशाबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष सुरेश आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी अभिनंदन केले. संजयला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. विजय देशमुख आणि प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले.